महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई – ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२
Website :- www.doa.maharashtra.gov.in Email:- dirdoa.mum-mah@gov.in/ directorateofart@gmail.com

क्रमांक – डिओओ/२०२३-२४/चार/२२८४ दिनांक :- ०६.१०.२०२३

**कालमर्यादित**

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य तथा
केंद्र प्रमुख, शासकीय रेखाकला परीक्षा २०२३ (सर्व).

## उत्तरपत्रिका विभागीय मूल्यमापन केंद्रावर जमा करण्याबाबत.

## प रि प त्र क

शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२३ च्या उत्तरपत्रिका खालील मुल्यमापन केंद्रांवर **सोमवार दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२३ ते शुक्रवार दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत** कार्यालयीन वेळेत जमा करावयाच्या आहेत. त्यासोबत सर्व केंद्रांच्या लॉगइन वर उपलब्ध करुन देण्यात आलेले एलिमेंटरी व इंटरमिजिएट या दोन्ही परीक्षांचे निकालपत्रक **(परीक्षेमध्ये अनुपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांच्या नावासमोर परीक्षेस अनुपस्थित असलेल्या विषयाच्या रकान्यामध्ये AB असे लाल शाईने लिहीलेले)**, विद्यार्थ्यांचे उपस्थिती अहवाल २ प्रतित, मेहनताना देयके २ प्रतित (फॉर्म ए व फॉर्म बी सोबत जोडण्यात आला आहे.) सोबत पाठविण्यात यावे.

केंद्र शाळेतील बँक खात्याचा तपशील बऱ्याचवेळा वैयक्तीक सादर केला जात असल्यामुळे केंद्र खर्चाच्या देयकांची रक्कम कार्यालयाकडून अदा करणे अडचणीचे होत आहे. याकरिता वित्त विभागाचा दिनांक १२.११.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार ई-कुबेर (e-Kuber) प्रणालीमार्फत त्रयस्थ अदाता (Third Party) यांच्या बँक खात्यात थेट रकमा जमा करण्याकरिता सदर प्रणाली शासनाने विकसीत केलेली आहे.

**"सदर नोंदणी करीता आपल्या शाळेचे खाते असलेल्या बँकेचा रद्द केलेला मुळ धनादेश तसेच शाळेचे नाव असलेले पॅनकार्डची छायांकित प्रत या दोहोंच्या मागे केंद्र क्रमांक लिहून शाळेचा शिक्का व सही करुन सदर माहिती उत्तरपत्रिकांसह मुल्यमापन केंद्रावर स्वतंत्र लिफाफ्यामध्ये सादर करावे." (व्यक्तीगत बँक खाते देवू नये.)**

| क्र. | मूल्यमापन केंद्राचे नांव. | संपर्क क्रमांक | जिल्हे |
|---|---|---|---|
| १ | संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई. | ८४५२०१३६५० | मुंबई, मुंबई उपगनर, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, उत्तराखंड व छत्तीसगढ . |
| २ | भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फाईन आर्ट, पुणे सातारा रोड, कात्रज, पुणे. | ७४३०२९४७९९ | पुणे |
| ३ | प्राचार्य, नव कृष्णा व्हॅली कला महाविद्यालय, पाटील हौद जवळ, जैन मंदीर, दुसरा मजला, मिरज, सांगली. | ९८२२३७२११७.<br>७०५८८४६४४५. | सांगली |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | मुख्याध्यापक, वि.स.खांडेकर प्रशाला, शाहूपुरी, व्यापार पेठ, कोल्हापूर ४१६ ००१. | ९४२२७४१६९५<br>९६७३७४१६९५ | कोल्हापूर |
| ५ | मुख्याध्यापक, अनंत इंग्लिश स्कूल, मंगळवार पेठ, शिवाजी उदय मंडळा शेजारी, राजवाडा जवळ, सातारा | ८४२१८२०४७० | सातारा |
| ६ | प्राचार्य, ललित कला महाविद्यालय, गंगापुर रोड, नाशिक | ०२५३-२३१०५१२ | नाशिक |
| ७ | अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, लक्ष्मीनगर,नागपूर - ४२० ०२२. | ०७१२-२२२४६८० | नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा. |
| ८ | प्राचार्य,चित्रकला महाविद्यालय,जनता कृषी विद्यालयाचे आवार, मोर्शी रोड, अमरावती - ४४४ ००१. | ०७२१-२६६१०३१ | अमरावती व यवतमाळ |
| ९ | प्राचार्य, बाबासाहेब ढोणे चित्रकला महाविद्यालय, माळी भवन, ज्योती नगर, जठारपेठ, अकोला. | ९९२३१४००९३ | अकोला, वाशिम व बुलढाणा. |
| १० | अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, झनाना महल, किल्ले आर्क, औरंगाबाद - ४३१ ००१. | ०२४०-२९७०२२५ | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली. |
| ११ | प्राचार्य, प्रगत महाविद्यालय, १, औटरॅम रोड, तारकपूर, अहमदनगर ४१४ ००३. | ०२४१-२४२८४८९ | अहमदनगर |
| १२ | प्राचार्य, सहयाद्री स्कुल ऑफ आर्ट, मु.पो. सावर्डे, ता. चिपळूण , जि. रत्नागिरी ४१५ ६०६ | ०२३५५-२६४२०९ | रत्नागिरी , सिधुदूर्ग |
| १३ | प्राचार्य, सप्तपुट ललित कला भवन, खिरोदा, ता. रावेर, जळगांव ४२५५०४. | २५८४-२८४२२४ | जळगांव. |
| १४ | प्राचार्य, स्कुल ऑफ आर्ट, स्टेशन रोड, धुळे | ०२५६२-२३२७६२ | धुळे व नंदुरबार |
| १५ | मुख्याध्यापक, श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय, जि.उस्मानाबाद ४१३ ५०१. | २४७२-२२३३७८ | उस्मानाबाद, सोलापूर, लातूर, बीड व नांदेड. |

सोबत :- वरील प्रमाणे.

(राजेश म. वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (दक्षिण, उत्तर व पश्चिम) / शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद (सर्व)
३) प्राचार्य, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फाईन आर्ट, पुणे सातारा रोड, कात्रज, पुणे.
४) प्राचार्य, नव कृष्णा व्हॅली कला महाविद्यालय, पाटील हौद जवळ, जैन मंदीर, दुसरा मजला, मिरज, सांगली.
५) मुख्याध्यापक, वि.स.खांडेकर प्रशाला, शाहूपुरी, व्यापार पेठ, कोल्हापूर ४१६ ००१.
६) मुख्याध्यापक, अनंत इंग्लिश स्कूल, मंगळवार पेठ, शिवाजी उदय मंडळा शेजारी, राजवाडा जवळ, सातारा.
७) प्राचार्य, ललित कला महाविद्यालय, गंगापुर रोड, नाशिक.
८) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपुर- ४२० ०२२.
९) प्राचार्य, चित्रकला महाविद्यालय,जनता कृषी विद्यालयाचे आवार, मोर्शी रोड, अमरावती.
१०) प्राचार्य, बाबासाहेब ढोणे चित्रकला महाविद्यालय, माळी भवन, ज्योती नगर, जठारपेठ, अकोला.
११) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद - ४३१ ००१.
१२) प्राचार्य, प्रगत महाविद्यालय, १, औटरॅम रोड, तारकपूर, अहमदनगर ४१४ ००३.
१३) प्राचार्य, सह्याद्री स्कुल ऑफ आर्ट, सावर्डे, रत्नागिरी.
१४) प्राचार्य, सप्तपुट ललित कला भवन, खिरोदा, ता.रावेर, जि. जळगांव ४२५५०४.
१५) प्राचार्य, स्कुल ऑफ आर्ट, स्टेशन रोड, धुळे.
१६) मुख्याध्यापक, श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जि.उस्मानाबाद.
१७) निवड नस्ती.

# परीक्षा केंद्रांसाठी महत्वाच्या सूचना

## अ) अबसेंट रिपोर्ट बाबत -

१) अबसेंट रिपोर्ट वरील तपशील व्यवस्थित भरावा.

२) अबसेंट परीक्षार्थींचे नंबर्स बिनचूक लिहावेत.


३) एखादा विद्यार्थी चार पेपर्स पैकी एखाद्या पेपरला अबसेंट किंवा प्रेझेंट असेल व इतर तिनही पेपरला प्रेझेंट किंवा अबसेंट असेल तर असा परीक्षार्थी पार्टली अबसेंट समजावा, म्हणजेच उपस्थित अनुपस्थित असे दोन्हीही असणे म्हणजे पार्टली अबसेंट होय. पार्टली अबसेंट उमेदवार एकूण उत्तरपत्रिका संचामध्ये गणला जावा.

४) **अबसेंट रिपोर्ट चार प्रतींमध्ये तयार करावा.( दोन्ही परीक्षांचे स्वतंत्र )**
**ऑनलाईन पध्दतीमुळे खालील बाबतीत लवचिकता राहील. परंतू मूल्यमापन केंद्राकडे अबसेंट रिपोर्ट ऑनलाईनची प्रिंट व सोबतच्या नमुन्याप्रमाणे अत्यावश्यक**

१ प्रत - कला संचालनालयाकडे
१ प्रत - उत्तापत्रिका मुल्यमापन केंद्र,................................................ यांना
१ प्रत - संबंधीत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या गठ्या मध्ये
१ प्रत - स्थळ प्रत (ऑफिस कॉपी)

## ब) उत्तरपत्रिकांचे परीक्षार्थी निहाय / ग्रेड निहाय संच तयार करणे

१) अनेकवेळा सूचना देऊन सुद्धा संच तयार करताना क्रम चुकीचा लावलेला दिसून येतो. त्यासाठी खालील आकृतीत दर्शविलेल्या क्रमा प्रमाणे संच तयार करावेत.




२) कला संचालनालयाकडुन मिळालेल्या परीक्षेच्या वेळापत्रकाप्रमाणेच विषयाचा क्रम लावून उत्तरपत्रिकांचा संच तयार करावा.
पेपर क्र.१ - वस्तुचित्र / स्थिरचित्र
पेपर क्र.२ - स्मरणचित्र
पेपर क्र.३ - संकल्पचित्र नक्षीकाम
पेपर क्र. ४ - कर्तव्य भूमिती व अक्षर लेखन / कर्तव्य भूमिती, घन भूमिती व अक्षर लेखन

३)परीक्षार्थिने काढलेल्या चित्राची दिशा उलट -सुलट अथवा शिक्क्याच्या बाजूला किंवा कशीही असो उत्तरपत्रिका संच तयार करीत असताना वरील आकृतीत दर्शविल्याप्रमाणेच वरील कोपऱ्यात उजव्या बाजूस केंद्राचा शिक्का, वरील कोपऱ्यात डाव्या बाजूस टाचणी या प्रमाणे पूर्तता करावी

४) शक्यतो परीक्षार्थींना केंद्राच्या शिक्क्याच्या विरुद्ध (मागील ) बाजूस चित्र काढण्याची सूचना दिल्यास बरे होईल. कर्तव्य भूमिती अक्षरलेखन हा पेपर यास अपवाद आहे.